Vol 6 Issue 5 Nov 2016

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor :4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 5 | November - 2016

GRT Golden Research Thoughts

# महाराष्ट्रीय लोकसंगीत–एक दृष्टीक्षेप

उत्तरा रतनसिंग तडवी
सहा.प्रा., जे.डी.पाटील सांगळूदकर महा. दर्यापूर,जि.अमरावती (महाराष्ट्र)

## सारांश

लोकसंगीत हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे. भारतीय संस्कृतीचे यथार्थ दर्शन लोकसंगीतातूनच घडते. जीवनाकरीता झगडणे (Struggle for Existence) ही प्राणीमात्रांची गरज होती. दिवसभर श्रम केल्यावर श्रम परिहार व मनोरजनार्थ शब्द, सूर व लय यांची सांगड घालणारे असे संगीत कळत नकळत निर्माण झाले. सुरूवात लयीने व नादाने झाली. मग शब्द व सूर मदतीला धावून आले व त्यांनी मानवी मनाची समरसता साथली. लयीच्या जोडीला सार्थ शब्दांची साथ मिळून ते लयबध्द काव्य झाले व काव्याला स्वरांची जोड मिळून त्याचे गीत बनले व ते लोकसंगीत म्हणून आकाराला आले.

## प्रस्तावना

''लोकांचे लोकांनी केलेले, लोकांसाठी निर्मिलेले व लोकांनीच एकत्रित स्वयंस्फूर्त लोकभाषेत रचलेले ते 'लोकगीत' आणि सरल सुलभ सहजतेने गायिलेले ते 'लोकसंगीत' होय. गीत, वाद्य व नृत्याचा अभिजात संगीताचा मूळ स्त्रोत म्हणजे लोकसंगीत.'' अठरा पगडजातींपासून उच्चभ्रूवर्गापर्यंत या ना त्या कारणाने रूढी, रितीरिवाज, सण, उत्सव यांच्या निमित्ताने परंपरागत व पिढयान्पिढया चालत आलेले लोकसंगीत हा भारतीय जीवनाला संजीवनी पुरवणारा लोकप्रकार आहे. श्रमपरिहार हे जरी लोकसंगीताच्या निर्मितीचे प्रमुख कारण असले, तरीसुध्दा समाजाच्या गरजांप्रमाणे म्हणजे सणवार, व्रतवैकल्ये, सांसारिक नाती, खेळ, तर कधी मनोरंजनाच्या हेतुने सुध्दा लोकगीताची निर्मीती झाली.

महाराष्ट्रातील लोकसंगीताचा विचार केल्यास सद्भक्ती व सदाचाराने दान मागणा–या वासुदेवापासून गोंधळी, पोवाडा व तमाशा असे बरेच प्रकार नजरेस पडतात.

### 1)वासुदेव गीते :–

सबंध आठ प्रहरांचे चक्र व त्यातील मानवी जीवनाचा व्यवहार शेतकरी जीवन हे आधारभूत धरून त्यावेळी लोकगीतांची निर्मित झाली. त्यामुळेच पहाटे 3 ते 4 ही पिंगळावेळ 5 नंतर पांगूळ, त्यानंतर वासुदेव यांची गीते ऐकून पहाटेपासून जीवन आनंदमय होत असे.

### 2) जात्यावरील ओवी :–

जात्यावरच्या ओवीतून एकाचवेळी महिलांना अनेक लाभ घडत असतात. जातं फिरविण्याचे श्रम हलके होतात. अगदी घरातील वडिलधा–यांचा वावर असतांना किंवा एरवी स्त्रीसुलभ संकोचाचे मनाला वळण पडले असतांनासुध्दा गळयाला वाट करून देण्याची भीड वाटत नाही.

'मालन गाथा' या आपल्या भावगंधाने डवरलेल्या ओवी–आस्वाद–संकलनात विख्यात कवयित्री इंदिरा संत यांनी एका ओवीचं उदाहरण दिलं आहे –

जात्या तू ईसवरा ऽ । तू त डोंगीराचा ऽ रूशी
खोलते तुज्यापाशी । माझ्या हरूदाच्य राशी ।।

जातं हे डोंगरातल्या ऋषीप्रमाणं आहे. ते दगडातून बनलेलं आहे आणि दळणारणीला जणू सहन शीलतेचा,मिळेल त्यात सुख मानण्याचा संदेश देत आहे. इंदिराजी सांगतात – ''जात्यावरच्या ओव्या म्हणजे अवघ्या संसाराचं उपनिषद. ओवीला जोडाक्षर माहितच नाही. इथे –हस्वदीर्घाची कसरत नाही. विरामचिन्हे नाहीत ती सर्वांतून मुक्त, म्हणून निर्मळ, लवचिक असा गोडवा तिच्यामध्ये असतो.




### 3) गोंधळ :–

महाराष्ट्रात गोंधळ हा लोकप्रकार दिसून येतो, दिमडी, तुणतुणे या वाद्यांच्या साथीने सादर होणारे,देवी नवसाला पावावी किंवा लग्नमुंजी सारख्या कार्यात अजाणता ज्या चूका झाल्या असतील त्यापासून ओढवणा–या अरिष्टांची शांती व्हावी म्हणून गोंधळ घालता येतो. यात गोंधळ लोक देवांच्या गोष्टी सांगतात. देवांच्या स्थानांची नावे घेऊन त्या त्या देवांना गोंधळासाठी पाचारण केले जाते. कुलधर्माचा महिमा वर्णन करून प्रत्येकाने आपल्या कुलधर्माचे पालन करावे असे प्रत्येक व्यक्तीच्या मनावर गोंधळी लोक ठसवत. अशाप्रकारे गोंधळाचे स्वरूप धार्मिक आहे.

### 4) जागरण :–

वाघ्या आणि मुरळी दोघे मिळून खंडेबाचे जागरण सादर करतात. घरात एखादे मंगल कार्य झाले तर त्याची सांगता जागरणाने होते. महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेषातील अनेकांचे कुलस्वामी म्हणून खंडोबाची उपासना चालू आहे. या कुटुंबात खंडेबाचे जागरण घालण्याची प्रथा आहे. देवीचा गोंधळ आणि खंडोबाचे जागरण लग्नसमारंभानंतर घालण्याची रूढी जवळजवळ सर्वत्र आढळते. कोकणात देखील लग्न

समारंभानंतर गोंधळ–जागरण घालतात. काही लोक केवळ देवीचा गोंधळ तर काही खंडोबाचे जागरण घालतात, तर काही लोक गोंधळ जागरण एकानंतर एक संयुक्तपणे घालतात.

***5) भराड :–***

भराड भैरव नाथाचे उपासक असतात. भराड–गोंधळ, जागरण यासरखेच एक विधीनाटय असल्याने त्याचा आकृतीबंधही जागरणाच्या आकृतीबंधासारखाच असतो. जसे घटस्थापना–देवतापूजन–आवाहन–गमन–आख्यानांचे सादरीकरण–आरती–भार उतरणे. भराडांचे निराळेपण असे की, येथे कूंकू व भंडा–याऐवजी विभूती वापरली जाते. आणि घरासमोर त्रिशूल रोवून त्यावर एक डमरू बांधतात. बाकी सारा प्रकार गोंधळ, जागरणाप्रमाणेच असतो. गायकीवर भर असतो व साथीला डमरूचा वापर केला जातो.

***6) पोवाडा :–***

हा एक वीररसप्रधान गीतप्रकार असून महाराष्ट्रात मराठयांच्या काळात अतिशय लोकप्रिय झाला. शूरवीर राजे व त्यांचे पराक्रम, सेनापती व राजांचे प्रमुख सरदार हयांच्या शौर्याची वीरगाथा, युध्दाची वर्णने हयांनी युक्त असा हा पोवाडा जनतेची मने जिंकून घेई. छत्रपती शिवाजी, तानाजीच्या पराक्रमाचे पोवाडे आजही तितक्याच ओढीने लोक ऐकतात. बुलंद खणखणीत आवाज, ललकारी जी जी जी ही धृवपदाला लागलेली, जेव्हां गायक गातात तेव्हां सामाजिक व राजकीय जनजागृतीला ते आव्हानात्मक वाटते. स्पष्ट शब्दोच्चार, आवेश व द्रुतलय, डफ व तुणतुण्याची साथ, कथानकाचा ओघ ही पोवाडयाची वैशिष्टये. छत्रपती शिवाजीच्या काळात अनेक शाहीरांनी कवने रचली व गायिली. पेशवाईतल्या रामजोशी, अनंत फंदी आणि प्रभाकर हया शाहीरांचे पोवाडे लोकप्रिय आहेत.

***7) भारूड :–***

1)वाच्यार्थ–व्यावहारिक
2)लक्ष्यार्थ–पारमार्थिक

अशा दोन्ही अंगांनी युक्त असा हा गीतप्रकार त्या काळात सर्वसामान्यांना भक्ती मार्गाला लावण्यासाठी फार उपयुक्त ठरला. भराडी समाजात गायिली जाणारी भारूडे, त्यात संत एकनाथांनी जीव ओतला. दैनंदिन जीवनात परमेश्वरी सूत्र कसे गावते व मानवाला परमार्थ साधन कसे करता येते हे नाथांनी आपल्या भारूडातून दाखवून दिले. या भक्तीपर भारूडात महालक्ष्मी, गोंधळ, जोगवा, भूत्या इत्यादी अनेक प्रकार असून निर्गुण निराकार आदिमायेवर भारूडे रचली गेली. एकनाथांची सर्व भारूडे अत्यंत काव्यमय, रसाळ व भक्तीरसपूर्ण व नितांत सुंदर असून ती आजही जनमानसाची पकड घेऊन आहे.

***8) गौळण :–***

गौळण हा एक भक्तीरसपूर्ण गीतप्रकार आहे. गौळणीत गोपींनी कृष्णाबद्दलची यशोदामातेकडे केलेली गा–हाणी, लटके, भांडण त्यात कौतुकमिश्रीत सूर असतो आणि तरीही हया गोपी कृष्णावर लुब्ध झालेल्या असतात. संत एकनाथांच्या गौळणी डौलदार लयीत व सुरावटीत बांधून संगीतात गायकांनी लोकप्रिय केल्या.

***9) लावणी :–***

लावणी हा मराठी गीतप्रकार म्हणजे महाराष्ट्राचा वैशिष्टयपूर्ण कलात्मक परंपरेची शान आहे. नृत्य, नाटय, संगीत यातून मनोरंजन करण्याचा एक शृंगारिक आविष्कार असून यातील गीते कधी चंचल व शृंगारिक तर कधी कोडे घालणारी, कधी भक्तीरसाचा आविष्कार करणारी व वेदांताचा पुरस्कार करणारी असतात. हिंदी भाषेतही क्वचित लावण्या असतात. लावणी हा ठसकेबाज, डौलदार अशा ढंगाचा गीतनृत्यप्रकार असून हयात मनाला खेचून टाकणारी कोडी सवाल–जबाबाच्या रूपात असतात. लावणीच्या हया सांगीतिक ठेवणीने समाजाला त्या काळात वेड लावले. लावणीचे हे विशेष लक्षात घेऊनच रामजोशी, होनाजी बाळा, सगणभाऊ, शाहीरांनी शृंगार, विरहार्तता इ.भावना लावणीतून व्यक्त केल्या.

'वग' हा दुसरा प्रकार तमाशात आला. पठ्ठे बापूराव, दगडू साळी हे वग युगाचे प्रवर्तक मानले जातात. वग म्हणजे नाटकातल्याप्रमाणे संवाद, त्यात कथानक ठरवून घेतलेले असते. परंतु प्रत्यक्ष संवाद मात्र पात्राने स्वयंस्फूर्तीने करावयाचे असतात, त्यामुळे लावणीची जागा वगाने घेतली व 'वग' हाच मनोरंजनाचा महत्वाचा घटक झाला. लावणी वाड्.मयाचे व नाटय वाड्.मयाचे सर्व विषय वगामध्ये हाताळले गेले. वगामुळे तमाशात आधुनिकता आली.

लोकगीतांचे जे विषय असतात ते मानव समाजाच्या दैनंदिन जीवनातील लहानमोठया घटनांवर आधारलेले असतात. भोंडल्याची गाणी, डोहाळजेवणाची, बारशाची गाणी, लग्नातील गाणी कुणीतरी म्हटल्याशिवाय 'विधी' पूर्ण झाल्याचे समाधान मिळत नाही. निसर्गतः स्वरसुंदर व लयसुंदर असलेले लोकसंगीत आपल्या शतकांच्या पूर्वपरंपरेनुसार जसेच्या तसे राहणे शक्य आहे का ? लोकसंगीत आपल्या मुळ रूपात टिकावे वासुदेवाचे गाणे दारावर ऐकायला मिळावे,
भारूड आपल्या मुळ रूपात सादर होत राहावीत आणि नागर व ग्रामीण लोकांनी ती ऐकावीत अशी आकांक्षा लोकसंगीत प्रेमींच्या मनात घर करून असते.

***संदर्भग्रंथ***

1)लोकरंगभूमी – डॉ.प्रभाकर मांडे – मधुराज पब्लीकेशन
2)संगीतशास्त्र परिचय–मोहना मार्डीकर–विजय प्रकाशन,नागपूर
3)आस्वादक संगीत समीक्षा–श्रीरंग संगोराय–राजहंस प्रकाशन,पुणे
4)संगीतशास्त्र विजयनी–डॉ.नारायण मंगरूळकर–स्वरसंपदा प्रकाशन,नागपूर
5)हिंदुस्थानी संगीत पध्दती–प्रा.डॉ.बाळ पुरोहित–शामल प्रकाशन नागपूर मुलतत्वे आणि सिध्दांत
6) संगीत कला विहार अंक–2005



***उत्तरा रतनसिंग तडवी***
***सहा.प्रा., जे.डी.पाटील सांगळूदकर महा. दर्यापूर,जि.अमरावती (महाराष्ट्र)***

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org